स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

नगरपरिषद प्रशासन संचालनालय

सातवा मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई महानगरपालिका इमारत

सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

☎022-24927631 https://www.mahadma.maharashtra.gov.in/ egovdesk.dma@gmail.com

---

क्र.नपप्रस/का-08/AI-Subscription/Quotation/2026/54 दि. 25 NOV 2026

दरपत्रक सूचना

विषय : संचालनालयाच्या कार्यालयीन व ई-गव्हर्नन्सविषयक कामकाजासाठी ChatGPT Business, Claude Team व Grok Business या AI प्लॅटफॉर्मचे संस्थात्मक सशुल्क Subscription उपलब्ध करून घेण्याबाबत दरपत्रक मागविणे.

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या प्रशासकीय व ई-गव्हर्नन्सविषयक कामकाजामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) आधारित साधनांचा प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने ChatGPT Business, Claude Team व Grok Business या AI प्लॅटफॉर्मचे संस्थात्मक (Organisation) सशुल्क Subscription घेण्याचे प्रस्तावित आहे.

त्याअनुषंगाने सदर AI प्लॅटफॉर्मचे अधिकृत सेवा पुरवठादार (Authorised Service Provider) / अधिकृत विक्रेते (Authorised Reseller) यांच्याकडून खालील तपशीलानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

१. आवश्यक AI Subscription चा तपशील

अ.क्र.	AI प्लॅटफॉर्म कंपनी /	प्रस्तावित Subscription Plan	आवश्यक युजर संख्या
१	OpenAI – ChatGPT	Business – Standard Seat	२
२	Anthropic – Claude	Team – Standard Seat	२
३	xAI – Grok	Grok Business	१

टीप : वरील प्रत्येक AI प्लॅटफॉर्मसाठी स्वतंत्र दरपत्रक सादर करणे आवश्यक राहील.

२. दरपत्रकामध्ये नमूद करावयाच्या बाबी

प्रत्येक AI प्लॅटफॉर्मसाठी सादर करण्यात येणाऱ्या दरपत्रकामध्ये खालील बाबींचा स्पष्ट उल्लेख असावा.

१. संबंधित AI प्लॅटफॉर्मच्या Subscription Plan चे अधिकृत नाव व उपलब्ध सुविधांचा तपशील.
२. प्रति युजर मासिक व वार्षिक Subscription शुल्क.
३. आवश्यक युजर संख्येनुसार एकूण मासिक व वार्षिक Subscription शुल्क.
४. लागू GST व इतर करांचा स्वतंत्र तपशील.
५. सर्व कर व अनुषंगिक शुल्कांसह अंतिम देय रक्कम (Total Cost Inclusive of All Taxes).
६. Subscription चा कालावधी, वैधता व नूतनीकरणाच्या अटी.
७. Subscription सक्रिय करण्यासाठी लागणारा कालावधी.
८. तांत्रिक सहाय्य (Technical Support) व ग्राहक सेवा सुविधांचा तपशील.
९. Organisation / Team Administration, Centralised Billing, User Management व Access Control यांसारख्या उपलब्ध सुविधांचा तपशील.

3. **अधिकृत सेवा पुरवठादाराबाबत कागदपत्रे**

दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेने खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक राहील.

१. कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र / संस्थेची नोंदणीविषयक कागदपत्रे.
२. GST नोंदणी प्रमाणपत्र.
३. PAN कार्डची प्रत.
४. संबंधित AI प्लॅटफॉर्मचे Subscription उपलब्ध करून देण्याबाबतचे अधिकृत प्राधिकरण व आवश्यक असल्यास कंपनीकडून प्राप्त केलेले अधिकृत कोटेशन. (आवश्यक असल्यास)

४. अटी व शर्ती

१. OpenAI (ChatGPT Business), Anthropic (Claude Team) व xAI (Grok Business) या प्रत्येक AI प्लॅटफॉर्मसाठी स्वतंत्र दरपत्रक सादर करणे आवश्यक राहील.
२. दरपत्रकामध्ये सर्व लागू कर, शुल्क व इतर अनुषंगिक खर्चांचा स्पष्ट उल्लेख करावा. कोणतेही अतिरिक्त शुल्क असल्यास त्याची स्वतंत्र माहिती द्यावी.
४. नमूद केलेल्या युजर संख्येनुसार संस्थात्मक Subscription उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.
५. Subscription हे वैयक्तिक वापरासाठी नसून संचालनालयाच्या अधिकृत कार्यालयीन वापरासाठी संस्थात्मक स्वरूपात उपलब्ध करून देण्यात यावे.
६. प्राप्त दरपत्रकांच्या आधारे Subscription शुल्क, उपलब्ध सुविधा, यांचे तुलनात्मक विवरणपत्र तयार करण्यात येईल.
७. दरपत्रक सादर केल्याने संचालनालयावर कोणत्याही प्रकारची खरेदी करण्याची बंधनकारकता राहणार नाही. खरेदीचा अंतिम निर्णय सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेच्या अधीन राहील.
८. Subscription खरेदीची प्रक्रिया प्रचलित शासन निर्णय, वित्तीय नियम व लागू खरेदी प्रक्रियेतील तरतुदींनुसार करण्यात येईल.

५. दरपत्रक सादर करण्याची पद्धत

इच्छुक अधिकृत सेवा पुरवठादार / अधिकृत विक्रेत्यांनी वरील सर्व बाबींचा समावेश असलेले स्वाक्षरीयुक्त दरपत्रक कंपनीच्या अधिकृत लेटरहेडवर आवश्यक कागदपत्रांसह खालील पत्त्यावर अथवा ई-मेलवर सादर करावे.

कार्यालयाचा पत्ता :

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
७ वा मजला, बेलापूर भवन, सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई – ४००६१४.

ई-मेल : egovdesk.dma@gmail.com

दरपत्रक सादर करण्याची अंतिम दिनांक : ०३/१२/२०२६

(मा. आयुक्त तथा संचालक यांच्या मान्यतेने)

(नूतन खाडे)
उपायुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई